बैंक ऑफ महाराष्ट्र
Bank of Maharashtra
भारत सरकार का उद्यम
एक परिवार एक बैंक

निगमित संप्रेषण व निवेशक

प्रधान कार्यालय: लोकमंगल, शिवाजीनगर, पुणे-5

टेलि - 020 25614495, 25614366, 25514501 से 12 विस्तार. 487

## वृत्तपत्रीय निवेदन

### बँक ऑफ महाराष्ट्रच्य तर्फे दि .१७ सप्टेंबर २०२२ रोजी विशेष लोक-न्यायालयाचे आयोजन

**पुणे दिनांक १५ सप्टेंबर २०२२** : देशातील एक अग्रगण्य राष्ट्रीयीकृत बँक असलेल्या बँक ऑफ महाराष्ट्रची तड़जोडीसाठी पात्र असलेली थकित कर्ज प्रकरणे सोडवून जलद कर्जवसूलीसाठी पुणे जिल्ह्यातील सर्व शाखा व विभागीय कार्यालयांसाठी "विशेष लोकन्यायालयाचे" आयोजन दिनांक १७ सप्टेंबर २०२२ रोजी केले आहे.

सदरील विशेष लोकन्यायालय हे बँक ऑफ महाराष्ट्रचे पुणे शहर विभागीय कार्यालय: 'यशोमंगल, ११८३/अ, फर्ग्यूसन महाविद्यालय रोड, शिवाजीनगर, पुणे ४११००५' येथे मुख्य जिल्हा न्यायाधीश व पुणे जिल्हा विधी सेवा प्राधिकरण अध्यक्ष श्री संजय देशमुख व पुणे जिल्हा विधि सेवा प्राधिकरणाच्या सचिव श्रीमती. एम डी कश्यप यांच्या विशेष उपस्थितीत व बँकेचे कार्यकारी निर्देशक श्री. ए. बी. विजयकुमार यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित केले जाणार आहे. तसेच बँकेच्या वसूली व विधी विभागाचे सरव्यवस्थापक श्री. प्रशांत खटावकर, पुणे शहर अंचल प्रबंधक सरव्यवस्थापक श्री. राजेश कुमार सिंह, पुणे पश्चिम अंचल प्रबंधक श्री राहुल वाघमारे आणि पुणे पूर्व अंचल प्रबंधक श्री अभिजीत चंदा तसेच प्रधान कार्यालय येथून वसूली एसऐएमव्ही व विधी विभागातील कार्यकारी अधिकारी उपस्थित राहून कार्यवहन करतील.

तरी अधिक माहितीसाठी पुणे जिल्ह्यातील थकित कर्जदारानी नजीकच्या बैंक शाखेशी संपर्क करावा किंवा ०२०-२५६१४२२३ या क्रमांकावर संपर्क करावा. सदरील विशेष लोकन्यायालयात हजर राहून सदर संधीचा लाभ घ्यावा व थकित कर्ज प्रकारणांचा निपटारा तड़जोड़ीने करून कर्जमुक्त व्हावे असे आवाहन बँकेकडून करण्यात आले आहे.